# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

**बांधकाम / विद्युत विभाग**

६१७८

**जा.क्र. मनपा/साबां/वा/ति-3 /२०२५-२६**
**दि. २० /११ /२०२५**

**प्रति,**
**सिस्टीम मॅनेजर**
माहिती तंत्रज्ञान विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :-** जाहीर सुचना महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रस्त्यावरील खड्डयांच्या तसेच मॅनहोल्स किंवा रस्त्यांच्या देखभालीतील त्रुटीमुळे झालेल्या मृत्यु अथवा जखमांच्या संदर्भात जनहित याचिका क्र.७१/२०१३ दि.१३/१०/२०२५ अन्वये दिलेल्या आदेशानुसार मिभा/मनपा/साबां/वि/६०१४/२०२५-२६ दि.१३/११/२०२५ रोजी समिती स्थापन करण्यात आली आहे. सोबत जोडण्यात आलेला मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि.१३/१०/२०२५ रोजीचा आदेश महानगरपालिकेच्या अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्द / upload करण्यात यावा.

**(नितिन मुकणे)**
**कार्यकारी अभियंता (साबां/वि)**
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**

कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे-४०११०१.

दुरध्वनी : 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985

ईमेल : headoffice@mbmc.gov.in वेबसाईट : www.mbmc.gov.in

मुख्य कार्यालय


जा.क्र./मिभा/मनपा/सा.बां/वि/सप/६०१४/२०२५-२६ दिनांक १३/११/२०२५

**वाचले :** मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि.13/10/2025 रोजीचा आदेश.

**आदेश :-**

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रस्त्यावरील खड्ड्यांच्या तसेच मॅनहोल्स किंवा रस्त्यांच्या देखभालीतील त्रुटीमुळे झालेल्या मृत्यु अथवा जखमांच्या संदर्भात जनहित याचिका क्र.71/2013 दि.13/10/2025 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार भरपाई ठरविण्यासाठी व वितरीत करण्यासाठी समिती स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत.

सदर आदेशनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये मृत्यु व जखमांच्या प्रकरणांमध्ये भरपाई देणे आवश्यक असून त्यासाठी गठीत समितीने चौकशी करुन भरपाई ठरवावी व संबंधित अभियंते, अधिकारी किंवा कंत्राटदाराकडून वसुली करण्याची जबाबदारी पार पाडावी असे नमूद आहे. मा. उच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

1) महानगरपालिका आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका - अध्यक्ष
2) सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे - सचिव

**समितीचे कार्य व अधिकार :-**

1. रस्त्यावरील खड्डे किंवा उघड्या मॅनहोलमुळे मृत्यु अथवा जखमी झालेल्या व्यक्तींची ओळख पटविणे.
2. प्रकरणाची चौकशी करुन खालीलप्रमाणे भरपाई ठरविणे व देय करणे.
   - मृत्युच्या प्रकरणात - रु.6,00,000/- कायदेशीर वारसांना देणे.
   - जखमींच्या प्रकरणात - जखमेच्या तीव्रतेनुसार रु.50,000/- ते रु.2,50,000/- पर्यंत देणे.
3. दावा प्राप्त झाल्यापासूप 6 ते 8 आठवडयांच्या आत भरपाई वितरीत करणे.
4. संबंधित अधिकारी, अभियंता किंवा कंत्राटदाराकडून भरपाईची रक्कम वसूल करण्याची जबाबदारी पार पाडणे.
5. दोषी आढळलेल्या व्यक्तींवर कठोर शिस्तभंग व दंडात्मक कारवाई करणे. (ब्लॅकलिस्टिंग, दंड आकारणी व फौजदारी कार्यवाही इ.)
6. प्राप्त झालेल्या तक्रारीनंतर सर्व खड्डे, किंवा मॅनहोल्स 48 तासांच्या आत दुरुस्त करणे आवश्यक असून, विलंब झाल्यास संबंधित अधिकारी व कंत्राटदारांविरुध्द कारवाई करणे.
7. समितीची पहिली बैठक माहिती मिळाल्यानंतर 7 दिवसांच्या आत बोलविण्यात येईल व त्यानंतर दर 15 दिवसांनी किमान एकदा बैठक घेण्यात येईल.

8. समितीच्या मा. उच्च न्यायालयास खालील बाबींसह वेळोवेळी अहवाल सादर करणे.

- प्राप्त तक्रारींची संख्या
- दिलेल्या भरपाईची माहिती
- कंत्राटदार/ अधिकाऱ्यांविरुध्द केलेली कारवाई
- लावलेला दंड
- शिस्तभंग / विभागीय कारवाईची माहिती

9. रस्त्यावरील खड्डे व मॅनहोलमुळे अपघात झाल्यास अपघातग्रस्त नागरीकांना किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने समिती सदस्यांनी वेळोवेळी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र.71/2013 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही पार पाडण्यात यावी.

10. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रस्त्यावरील खड्ड्यांमुळे जिवीतहानी होणार नाही यास्तव आवश्यक त्या उपाययोजना करणे.

**(राधाबिनोद शर्मा, भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा प्रशासक**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**<u>प्रत माहितीस्तव :-</u>**

1) **मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर भवन, महानगरपालिका इमारत, 7 वा मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.**
2) **मा. सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे**
3) **शहर अभियंता, मिरा भाईंदर महानगरपालिका**